● बीड ● रविवार, दिनांक ६ जुलै २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email:beedvatsav@gmail.com

विठ्ठल आवडी प्रेमभावो। विठ्ठल नामाचा रे टाहो॥



सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



यशस्वी २० वर्ष

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट




http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# शेतकरी आत्महत्या कमी करायच्या असतील तर बीड जिल्ह्याला विमानतळाची नव्हे तळ्यांची गरज!!

**रोज शेतकरी आत्महत्या, हातांना कामे नाहीत, खायला ज्वारी नाही, ऊसतोड कामगारांचा जिल्हा तिथे विमानात बसणार तरी कोण?**

**बीड जिल्हा मराठवाड्याचा केंद्रबिंदू तेव्हा नगर ते नांदेड अन् सोलापूर ते धुळे या रेल्वे मार्गासाठी प्रयत्न करा, अनेकांचे भले होईल!!**

**डॉ. ओमप्रकाश शेटे यांचा पाठपुरावा! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा साळींबा उपसासिंचन योजनेस हिरवा कंदील**

## बीडच्या खासदारांनी जे करायला पाहिजे ते ओमप्रकाश शेटे यांनी केले!









बीड : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात रोजच शेतकऱ्यांच्या चिता पेटत असताना जर कोणाला विचारले बीड जिल्ह्याला तळ्यांची गरज आहे का, विमानतळाची? तर 99 टक्के लोकं म्हणतील तळ्यांची गरज आहे. एका टाक्यात ते लोक आहेत ज्यांना विमानतळ करून त्या ठिकाणाच्या जमिनींचे भाव सोन्यापेक्षा जास्त दराने विक्री करायचे आहेत.

आश्चर्य वाटतंय की मराठवाड्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात होताहेत. हे पत्रकार म्हणत नाहीत तर शासन दप्तरी याची रीतसर आणि अधिकृत नोंद आहे. अशा परिस्थितीमध्ये जनतेची मागणी नसताना फक्त बीड जिल्ह्याचे काळजीवाहू खासदार यांनाच विमानतळ कशासाठी हवे? बीड जिल्ह्याचा विकासच करायचा आहे तर रेल्वेचे जाळे वाढवा. बीड जिल्हा हे मराठवाड्याचे केंद्रबिंदू आहे. त्यामुळे साहजिकच अनेकांच्या हाताला काम मिळेल. रोजगाराचा कायमचा प्रश्न मिटेल आणि अनेकांना रोजगार उपलब्ध होईल. एवढेच नव्हे तर सतत दुष्काळाने पाठराखण केलेला जिल्हा म्हणून उभ्या महाराष्ट्रात बीड जिल्ह्याची ओळख आहे. तेव्हा या बीड जिल्ह्यात सिंचन क्षेत्र वाढविण्याची गरज आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे, शेतीमालाला भाव मिळत नसल्यामुळे तसेच सिंचन क्षेत्र कमी असल्यामुळे आर्थिक विवंचनेत सापडलेला तरुण शेतकरी मागचा पुढचा विचार न करता गळ्याला फास लावत आहे. या आत्महत्या रोगाच्या असतील आणि आमच्या माता मावल्यांचे कपाळ यापुढे पांढरे पाडायचे नसेल तर बीड जिल्ह्यात सिंचन क्षेत्र वाढविण्याची नितांत गरज असल्याच्या भावना व्यक्त केल्या जात आहेत.

## साळींबा योजना कार्यान्वित केल्या बद्दल शेटे यांचे लाख लाख धन्यवाद!

● बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील काही भाग कायम दुष्काळी व आवर्षणप्रवण क्षेत्र आहे. त्यामुळे बारमाही कोरडवाहू असलेली शेती ओलिताखाली आणण्यासाठी साळींबा उपसासिंचन योजना ही सदर भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. मात्र अनेक वर्षापासूनच्या या मागणीला देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्यामुळे गती मिळाली आहे. सदरील योजनेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दिला असून या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबत जलसंपदा विभागाला सूचना दिल्या आहेत. सदरील योजनेमुळे हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे.

## योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबत जलसंपदा विभागाला सूचना


● उपरोक्त योजनेचे अंदाजपत्रक तयार करून जायकवाडी टप्पा – 2 अंतर्गत सुधारित प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे. वडवणी तालुक्यातील कोरडवाहू शेतीस पाणी मिळण्यासाठी साळींबा ता. वडवणी जि. बीड उपसासिंचन योजनेस तातडीने मान्यता देऊन तिच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा आग्रह व विनंती डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. त्यास यश आले असून सदरील योजनेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दिला असून या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबत जलसंपदा विभागाला सूचना दिल्या आहेत. सदरील योजनेसाठी माजलगाव धरणाचे बॅक वाटर वापरात येणार असून यात सहा गावच्या शिवारातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे.

## साळींबा सिंचन योजना किती महत्त्वाची हे मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले!

● वडवणी तालुक्यातील काही भागात वारंवार दुष्काळ पडतो. अल्प पर्जन्यमान व जलस्रोतांची मर्यादा यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडलेला आहे.

● परिणामी, शेती उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक हानी सहन करावी लागते. साळींबा उपसासिंचन योजना राबविल्यास पाण्याची उपलब्धता वाढून ओलिताखालील शेतीचे क्षेत्र वाढण्यास मदत होईल.

● तसेच शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास देखील हातभार लागेल ही बाब शेटे यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.



### अभंगरचना

चालती माऊली वाट पंढरीची।
आनंदे गाती भक्तांचीया ह्रदयी ॥१॥

भक्तजन येती संताचीया या भेटी।
डोंगर माथे करी पायपीट ॥२॥

नामाचा गजर गातो भक्तांचिया मुखी।
स्वर्गाचा आनंद येतो धावत अंगी ॥३॥

पंढरीच्या वाटी वृक्ष येती सोबती।
भाविकांच्या ध्यानी विठूच माऊली ॥४॥

प्रस्थान समयी करू वृक्षारोपण।
निसर्ग टिकवू आपण मिळवून ॥५॥

भक्त म्हणे आता ओढ दर्शनाची।
निसर्गाच्या ठाई उभा पांडुरंग ॥६॥

**डॉ.उध्दव घोशीर**
श्री तिलोक जैन विद्यालय पाथर्डी
मो. 9420953009



# “विठ्ठलाने” अपार श्रद्धा असलेल्या लाडक्या देवाभाऊला आषाढी एकादशीच्या महापूजेला सपत्नीक “पुन्हा” बोलावलेच...!

महाराष्ट्र राज्यातील अनेक वर्षांपासूनच्या परंपरेनुसार, आषाढी एकादशीच्या महापूजेचा सपत्नीक माण हा राज्याच्या मुख्यमंत्र्यांना मिळतो आणि मग, आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर मी मागील वर्षी देवाभाऊ सोबतच्या त्या गोड आठवणीत रमलो त्या भेटीवेळी मी नकळत बोललो होतो “भाऊ” पुढील वर्षी आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलाच्या महापूजेचा शासकीय माण हा तुम्हालाच मिळणार कारण आम्हा सर्वांना खात्री होती पंढरीचा विठुराया भाऊंनाच जुलै २०२५ रोजी पंढरपूर ला महापुजेसाठी बोलावणारच..!

राज्याचे मुख्यमंत्री तथा माझ्या सारख्या लाखो कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान मा.देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्यासोबत अनेकदा भेटीचा योग आला आहे मा.भाऊंची सदिच्छा भेट म्हणजे सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करतानां एक अमर्याद उर्जा मिळवण्याचं माध्यम असत कधी गुलाबाचं फूल, कधी गुच्छ (बुके) घेऊन भाऊंची भेट घेण्याचा योग आला पण मागील वर्षी भेटीवेळी, मनात काही वेगळंच घडत होत मा.भाऊंची भेट घेतांना मी विचार करत होतो यावेळी भेटीसाठी काय घ्यावं? गुलाबाचं फूल? बुके? की फोटो फ्रेम?

तेवढ्यात आठवल पुढील वर्षी तर आषाढी एकादशी आहे! आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजेचा मान यंदा सपत्नीक देवाभाऊंनाच मिळणार हे मनोमन ठरवलं होतं!

म्हणूनच मी विठ्ठल-रुक्मिणी मातेची एक सुंदर मूर्ती घेऊन भाऊंची सदिच्छा भेट घेतली त्या वेळी मी भावनेनं बोलून गेलो “भाऊ” पुढील वर्षी आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलाच्या महापूजेचा माण तुम्हालाच मिळणार! आणि झालंही तसंच! २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेनं विशेषत: लाडक्या बहिणींनी आणि सामान्य मतदारराजान आपल्या हक्काच्या मुख्यमंत्र्याला, देवाभाऊंना, भरभरून मतदानरुपी आशीर्वाद दिला आणि पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान केलं.

साक्षात विठ्ठल-रुक्मिणी मातेचा आशीर्वाद पाठीशी असलेल्या



मा.देवेंद्रभाऊ यांना भीती कसली?

त्या वेळचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री मा.देवेंद्रभाऊ लातूर-निलंगा दौऱ्यावर होते पूर्वनियोजित कार्यक्रम आटपून, त्यांचं हेलिकॉप्टर आकाशाकडे झेपावत होत पंख्याच्या जोरदार वाऱ्याने जमिनीवरील मातीचा धूर उडालाआणि काही वेळातच, प्रसारमाध्यमांतून एक धक्कादायक बातमी समोर आली मुख्यमंत्री मा.देवेंद्रभाऊ ज्या हेलिकॉप्टरमध्ये होते, ते हेलिकॉप्टर हवेत झेपावतानाच अचानक गटांगळ्या खात खाली कोसळलं! ते थेट जमिनीवर क्रॅश झालं. हेलिकॉप्टरचं मोठं नुकसान झालं त्याचा स्पर्श लाइटच्या डिपीला झाला. पणमा.देवेंद्रभाऊंना साध खरचटले सुध्दा झालं नाही! कारण त्यावेळी त्यांच्या जवळ होती एका किर्तनकाराने कार्यक्रमात दिलेली विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती! आजही ती मूर्ती त्यांच्या घरातील देव्हाऱ्यात श्रद्धेने विराजमान आहे प्रत्येक आषाढी एकादशीला देवाभाऊ संपूर्ण कुटुंबासह त्या विठ्ठल-रखुमाईची मनोभावे पूजा करतात..सांगायच तात्पर्य हेच आहे देवाभाऊच्या पाठिशी साक्षात नेहमी “देव” उभा आहे सर्वांना कल्पना आहे 2019 मध्ये स्पष्ट कौल जनादेश मिळवूनही मुख्यमंत्रीपद गेल तरीही हा माणूस खचला नाही विरोधीपक्ष नेते पदाची जबाबदारी स्वीकारून तत्कालीन महाविकास आघाडीला राज्यात जनहितार्थ निर्णय घ्यावे म्हणून अक्षरक्ष कोरोनाच्या भयंकर स्टेज मध्ये राज्यभर दौरे करून तसेच प्रत्यक्ष सभागृहात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला धारेवर धरून सळोकी पळो करून सोड करून सोडले होते...कालांतराने काही राजकीय तडजोडीमुळे मुख्यमंत्री पदाऐवजी उपमुख्यमंत्री पद हसत मनाने स्वीकारले भाजपचा निष्ठावंत कार्यकर्ता व पक्ष आदेश म्हणून “मि पुन्हा येईल” या वाक्याची अनेकांनी टेहाळणी केली परंतु तो पांडुरंगाच्या आशिर्वादाने “पुन्हा आला”

**-संतोष जाधव**
भाजप सोशल मीडिया प्रदेश कार्यकारिणी सदस्य

---

# वारीतल्या गोष्टी



विशेष

**• शीला पतकी, सोलापूर**
मोबाईल. 88058 50279

काल एकाच्या तोंडून वारीतील गोष्ट ऐकली खूप आवडली. गृहस्थ वारीला निघाले चालण्याची सवय नाही पण तो माहोलच असा असतो आणि अंत:करणातली पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ.... हे काही जाणवत नाही .असे म्हणतात की पांडुरंग वारकऱ्यांच्या पायावरून रात्री हात फिरवतो आणि त्याचं दुखणं गायब...असेलही खरं किंवा ती त्यांची श्रद्धाही असेल ...!तर हे वारकरी गृहस्थ रस्त्याने निघाले आणि अचानक चप्पल तुटली लंगडत चालायला लागले आपल्या दिंडी बरोबरचा स्पीड जमेना खरडत खरडत तसेच निघाले .आसपास चप्पल दुरुस्त करणारा दिसेना चप्पल हातात घेऊन मोकळ्या पायाने चालणं कधीच माहीत नव्हतं घरात सुद्धा चप्पल घालणारी मंडळी पण पांडुरंग कृपेने एक माणूस त्यांना रस्त्यावर दिसला की जो चप्पल दुरुस्त करून देत होता .गृहस्थ तेथे थांबले आणि त्याच्याकडे जाऊ लागले इतक्यात तोच म्हणाला,” काय माऊली चप्पल तुटली का ?आत्ता दुरुस्त करून देतो आणा इकडे” आणि पाच मिनिटात त्याच्या कलाकुसरीने चप्पल दुरुस्त झाली आणि त्यांनी त्याच्या समोर ठेवली. गृहस्थ म्हणाले,” किती पैसे झाले?” चप्पल शिवून येणारा तो चांभार म्हणाला,” छे छे माऊली याचे कसले पैसे ?पैसे मी घेत नसतो” त्यावर ते गृहस्थ म्हणाले अरेतुझापोटापाण्याचा व्यवसाय आहे तू माझी चप्पल शिवून दिली त्या बदल्यात मी तुला पैसे देतोय. अगदी बरोबर आहे ना हे फुकट कोणाचा घेऊ नये बाबा ..” !त्यावर तो चप्पल शिवणारा म्हणाला, “छे! छे !!बाबा मी फुकट देतच नाही तुम्हाला या बदल्यात मी तुम्हाला माझे एक काम सांगणार आहे तेवढं करा “ ...”बोल बाबा काय तुझं काम आहे ?”गृहस्थ म्हणाले .तो म्हणाला, काही नाही आता चाललाय तुम्ही वारीला तर पांडुरंगा पर्यंत माझी एक प्रार्थना पोचवा” ..ते म्हणाले ,”ठीक आहे पोहोचवतो काय प्रार्थना करू त्याला सांगा” ...”म्हनाव रांजणगावच्या सोपानला वारी संग चालत यायचे पण ते या जन्मी शक्य नाही त्याला म्हणावं पुढल्या जन्मी तरी पाय दे देवा म्हणजे पाई चालत तुझ्या वारीला येईन” .....समोरचा माणूस अवाक होऊन त्याच्याकडे पाहू लागला ...त्याच्या पायावर एक फडके होते त्यांनी ते किंचित सरकवले आणि त्याला दिसलं की या माणसाला दोन्ही पाय नाहीत.......गृहस्थांचे डोळे वाहू लागले.....

ते म्हणाले ,”हो ही तुझी प्रार्थना मी पांडुरंगापर्यंत नक्की पोहोचवेन आणि मी सुद्धा तुझ्यासाठी त्याच्याकडे प्रार्थना करेन ..“राम कृष्ण हरी म्हणून त्याला हात जोडीत तो माणूस पुढे निघाला ...डोळे भरून वाहत होते ...पांडुरंगाच्या वारीत पुढल्या जन्मी येण्याची ओढ असलेला तो पाय नसलेला तरुण पोरगा त्यांच्या नजरेसमोरून हालत नव्हता आणि मग त्यांनी आपल्या दोन्ही पायावरून हात फिरवला दोन्ही हात जोडले आणि तेम्हणाले ,”भगवंता केवढी असीम कृपा आहे तुझी आमच्यावर की आम्हाला तू धड धाकट शरीर दिले आहे यासाठी तुझे रोज रोज आभार मानायला हवेत यापेक्षा खरोखर वेगळे काही मागणीच असता कामा नये आता या शरीरात दुसऱ्याच्या वेदना जाणणारे मन दे इतकेच मी मागेन” ....वाहणारे डोळेत्यानी पुसले आणि तो पुढे चालू लागला .....!

राम कृष्ण हरी



---

# २०२६ : आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष — स्त्रीशक्तीच्या कष्टांना जागतिक सलाम

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ म्हणून जाहीर केले आहे. ही घोषणा फक्त औपचारिक मान्यता न राहता, जगभरातील शेतीव्यवस्थेत महिलांनी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यासाठी आहे.
भारतासारख्या कृषीप्रधान देशात, महिलांचा शेतीत सहभाग केवळ पूरक नाही तर अत्यावश्यक आहे. मात्र, त्यांच्या श्रमांना अद्याप अपेक्षित ओळख व सन्मान मिळालेला नाही, हे वास्तव लक्षात घेतल्यास ही घोषणा अधिक महत्त्वाची ठरते.
भारतातील ग्रामीण भागातील सुमारे ८० टक्के महिला थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीत कार्यरत आहेत. मात्र यांपैकी फक्त १३.९ टक्के महिलांच्याच नावावर जमीन आहे. त्यामुळे शेतकरी म्हणून त्यांना अधिकृत ओळख मिळत नाही आणि त्यांचा सरकारी योजनांवरील हक्क मर्यादित राहतो. ही बाब सामाजिक आणि धोरणात्मक पातळीवरील गंभीर अडचण ठरते.



## हजारो वर्षांची नाळ — महिला आणि शेती

भारतीय महिलांनी पारंपरिक कृषिकौशल्यात मोलाचे योगदान दिले आहे. बियाण्यांची निवड व जतन, निंदणी, काढणी, साठवणूक, रोग व कीड व्यवस्थापन, अन्न प्रक्रिया उद्योग यांसारख्या कामांत महिलांचा सहभाग मूलभूत राहिला आहे. त्यांच्या अनुभवातून आलेले हवामान व मातीचे ज्ञान, रोगप्रतिबंध व अन्न सुरक्षेची जाण आज जैविक शेतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. आदिवासी व ग्रामीण भागांतील महिलांकडे असलेले नैसर्गिक उपायांचे ज्ञान आता नव्या शेती विकासाच्या केंद्रस्थानी येत आहे.

## आधुनिक शेतीतील महिला नव्या वाटा, नवे प्रयोग

आजच्या काळात महिलांनी पारंपरिक भूमिकेपलीकडे जाऊन नव्या शेती व्यवसायांत उंच भरारी घेतली आहे. सेंद्रिय शेती, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस, सौरऊर्जा, फूलशेती, प्रक्रिया उद्योग, डिजिटल कृषी बाजार यामध्ये त्यांचा उल्लेखनीय सहभाग आहे. महिला बचत गटांनी सामूहिक खरेदी-विक्री केंद्रे, प्रक्रिया युनिट्स, आणि शेतीत खर्च कमी करणारे उपक्रम राबवले आहेत.
काही महिला आज ‘अग्रो-स्टार्टअप्स’ चालवत आहेत, तर काही महिलांच्या नेतृत्वात संपूर्ण गाव शेतीत नवे प्रयोग करत आहे. इंटरनेट, स्मार्टफोन, कृषी ॲप्सच्या वापरातून हवामान अंदाज, बाजारभाव व तांत्रिक मार्गदर्शन मिळवून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

## शेती धोरणांमध्ये महिलांना केंद्रस्थानी ठेवण्याची गरज

महिलांना अद्यापही सरकारी योजनांचा पूर्ण लाभ मिळताना अडथळे येतात — माहितीचा अभाव, तांत्रिक प्रशिक्षणाची कमतरता आणि सामाजिक बंधने हे त्यामागील प्रमुख कारणे आहेत. हे लक्षात घेऊन केंद्र व राज्य सरकारांनी महिलांसाठी अनेक योजना राबवायला सुरुवात केली आहे. ‘महिला कृषी सशक्तीकरण योजना (MKSP)’, ‘प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना’, ‘ई-नाम’, ‘राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान’ या योजना त्यामध्ये उल्लेखनीय आहेत. महाराष्ट्र शासनानेही महिला शेतकऱ्यांसाठी विशेष कार्यक्रम आखले आहेत. ‘माझी शेती माझा अभिमान’, ‘माझी माती माझा देश’, जैविक शेती अभियान, महिला शेतकरी मेळावे यांमधून महिलांना प्रोत्साहन दिले जात आहे. प्रत्येक गावात एक महिला शेतीमार्गदर्शक तयार करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे.

## सेंद्रिय शेतीतून शाश्वत उत्पन्नवाढ

महिलांनी सेंद्रिय शेतीत वापरलेली जैविक खते, नैसर्गिक किटकनाशके, बियाणे संकलन, ठिबक सिंचन या उपायांनी उत्पादन खर्चात २० ते ३० टक्क्यांची घट केली आहे. फळप्रक्रिया, मसाले निर्मिती, सुकी मिरची, हळद, आले यांसारख्या उत्पादनांची प्रक्रिया करून उत्पन्नवाढीस हातभार लावण्यात महिला पुढे आहेत.

## शेती : केवळ उपजीविका नव्हे, तर परिवर्तनाचे माध्यम

शेती ही फक्त उपजीविकेचे साधन नसून आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते. महिलांना शिक्षण, जमीन हक्क, अर्थसहाय्य, आधुनिक तंत्रज्ञान व बाजारपेठेतील प्रवेशाच्या संधी देऊन शेती व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवणे शक्य आहे. महिलांचा सहभाग वाढवणे म्हणजे केवळ त्यांच्या सक्षमीकरणाची बाब नाही, तर संपूर्ण शेतीक्षेत्राच्या उत्कर्षाचे लक्षण आहे.

## महत्तवाचा टप्पा — धोरण बदलांची सुरुवात

२०२६ हे वर्ष महिला शेतकऱ्यांच्या योगदानाचा जागतिक स्तरावर सन्मान करणारे आहे. मात्र, हे वर्ष केवळ उत्सव न राहता, शेती धोरणात महिलांना केंद्रस्थानी ठेवणारा निर्णायक टप्पा ठरावा, हीच आजच्या काळाची गरज आहे.
स्त्रीशक्ती आणि शेती यांचा संगम भारतीय शेतीला शाश्वतता, नवाचार आणि समृद्धीच्या दिशेने नेईल, यावर शंका नाही.

**निता पवार**
सक्षम महिला बचत गट जाटदेवळे

---

# आषाढी वारीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून वारकऱ्यांसाठी एक लाख वारकरी बॅगचे वाटप



पंढरपूर : प्रतिनिधी
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथराव शिंदे साहेब यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी उपस्थित राहून वारकऱ्यांना एक अमूल्य भेट दिली.

या पवित्र वारीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री यांच्या वतीने 4 जुलै रोजी 1 लाख वारकरी बॅगचे मोफत वितरण करण्यात आले. हजारो किलोमीटरचा



प्रवास करून “विठोबाच्या भेटीला” आलेल्या भक्तांसाठी हा उपक्रम अतिशय महत्वाचा ठरला आहे.

या वितरणाचा संयोजनाचा पुढाकार युवासेना मराठवाडा निरीक्षक मा. बाजीराव (दादा) चव्हाण यांनी उचलला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण नियोजन व वितरणाची अंमलबजावणी शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

या उपक्रमामुळे लाखो वारकऱ्यांमध्ये आनंदाची आणि समाधानाची आणि कृतज्ञतेची भावना निर्माण झाली होती. वारकऱ्यांनी उपमुख्यमंत्री व आयोजकांचे मन:पूर्वक आभार मानले.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हे योगदान सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरले आहे.

“वारी म्हणजे चालती भागवतधर्माची शाळा, आणि या शाळेतील प्रत्येक भाविक हा ज्ञानेश्वरीचा पाठ शिकणारा विद्यार्थीच,” असे म्हणत शिंदे साहेबांनी वारकऱ्यांच्या सेवेस आपले सामाजिक कर्तव्य मानले आहे.

---

# तुळशीच्या पानावर साकारले श्री विठ्ठलाचे चित्र





माजलगाव : कार्तिक शुध्द द्वादशीला तुळशी विवाह साजरा केला जातो .तुळशी लग्न विठ्ठल( विष्णू.. कृष्ण )यांच्याशी लावले जाते. तिच्या भक्तीमुळे तिला विष्णूने पत्नी पद दिले. विठ्ठलाला अर्पण करण्यात येणारे तुळशीपत्र हे सर्वात प्रिय मानले जाते. विठ्ठलाच्या नामस्मरणासाठी तुळशीची माळ वापरली जाते .असेच आषाढी एकादशी निमित्त श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालय माजलगाव जिल्हा बीड येथील कला शिक्षक नवनाथ सांगुळे यांनी तुळशीच्या पानावर २x३.२ सेंटीमीटर या अगदी छोट्या पानाच्या आकारावर चित्र रेखाटले असून त्यांना या कामासाठी दीड तास कालावधी लागला असून पोस्टर रंगात श्री विठ्ठलाचे चित्र साकारले.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## वाढदिवस साजरा





आष्टी : तालुक्यातील सामजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख यांचे पुतणे आवेज सद्दाम शेख याचा वाढदिवस साजरा करताना कुटुंब व बालगोपाल दिसत आहेत


## अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे आयोजित पत्रकारिता सन्मान सोहळा





मुंबई : आझाद मैदान येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे आयोजित पत्रकारिता सन्मान सोहळा कार्यक्रम खा. शरदचंद्र पवार व प्रसिद्ध अभिनेते भरत जाधव यांच्या उपस्थित पार पडला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष एस.एम देशमुख यांचा सत्कार केला. समवेत डोंगराजा राजा संपादक अनिल वाघमारे दिसत आहेत.

# झोपताना मोबाईल जवळ ठेवण्याचे धोके जास्त असतात म्हणून....



सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल ही काळाची गरज झाले आहे. शाळेचा अभ्यास असो कि ऑफिसचे काम लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेजण मोबाईल वापरू लागले आहेत. जेवणापासून ते रात्री झोपेपर्यंत मोबाईल जवळ बाळगण्याची सगळ्यांनाच सवय लागली आहे. यामुळे अनेकजण रात्री झोपतानाही मोबाईल उशीखाली किंवा बाजूला ठेवून झोपतात. ज्याचे नकारात्मक परिणाम व्यक्तीच्या शारीरिक आरोग्यासह मानसिक आरोग्यावरही होऊ शकतात. यामुळे मोबाईल वापरणाऱ्या प्रत्येकाला मोबाईल वापरण्याच्या दुष्परिणामांचीही माहीती असणे आवश्यक आहे. जेणेकरून वेळीच सावध होऊन पुढील अनर्थ टाळता येणं शक्य आहे.

### मोबाईल किती अंतरावर ठेवावा?

■ मोबाईल कधीही डोक्याजवळ उशीखाली किंवा बेडसाईटवर ठेवून झोपू नये. त्याऐवजी झोपताना मोबाईल दुसऱ्या खोलीत ठेवावा. ते ही शक्य नसेल तर ज्या खोलीत झोपत आहात त्या खोलीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या टेबलवर फोन ठेवू शकता.

■ जर मोबाईल दुर ठेवणे शक्यच नसेल तर तो एअरप्लेन मोडवर ठेवावा.

■ कारण तज्ज्ञांच्या मते बेड शेजारी फोन ठेवून झोपल्याने तणाव निर्माण होऊ शकतो.

■ मोबाईलमधून निघणाऱ्या रेडिएशनचा तुमच्या मेंदूच्या स्नायूंवरही वाईट परिणाम होतो.

■ ज्यावेळी व्यक्ती टेन्शनमध्ये असतो आणि मोबाईल डोक्याजवळ ठेवून झोपतो तेव्हा डोकेदुखीबरोबरच टेन्शन वाढते.


■ कारण मोबाईल रेडीएशनचा परिणाम मेंदूवर सातत्याने होत असतो. पण स्ट्रेस आल्यास तो अधिक प्रभावी होतो.

## महाराष्ट्र, गोवा नोटरी असोसिएशनच्या प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्तेपदी ॲड महावीर कांकरिया



गेवराई : प्रतिनिधी महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या बीड जिल्हा सत्र न्यायालयात कामकाज केलेले व वाळूज पंढरपूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध नोटरी ॲड महावीर एम.कांकरिया यांची प्रदेश उपाध्यक्ष व प्रवक्तेपदी महाराष्ट्राचे व गोवाचे अध्यक्ष नोटरी ॲड सय्यद सिकंदर अली व सेक्रेटरी नोटरी ॲड प्रवीण नलावडे व प्रभारी अध्यक्ष नोटरी ॲड यशवंत खराडे व महाराष्ट्र व गोवाचे नोटरी उपाध्यक्ष नितेश जी ललवाणी यांनी नियुक्तीपत्राद्वारे केली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल बीड जिल्हा नोटरी असोसिएशन तर्फे नोटरी ॲड रामजी दहिवाळ, नोटरी ॲड एच एस पाटील, नोटरी ॲड राहुलकुमार राका, नोटरी ॲड विलासराव पाटील, नोटरी ॲड शरदराव काळे, नोटरी ॲड अलका बडे मॅडम व बीड जिल्ह्यातील तमाम नोटरीअन बंधू-भगिनींनी शुभेच्छा व अभिनंदन केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे नोटरी ॲड राहुलकुमार राका यांनी आभार व्यक्त केले आहे.

## समाधीस्थ आचार्य 108 विद्यासागरजी महामुनीराज दीक्षा दिवस साजरा



छत्रपती सभाजीनगर : 1008 भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर येथे समाधिस्त आचार्य विद्यासागर जी महाराजांचा 58वा मुनि दीक्षा दिवस साजरा करण्यात आला... या कार्यक्रमासाठी चार्तुमास साठी विराजमान असलेले जन संत 108 उपाध्याय वीरंजन सागर जी मुनी महाराज ससंघ होत .. सर्वप्रथम सकाळी भगवताचा अभीषेक करण्यात आला तदनतर प्रथम आचार्य श्री चे चित्र अनावरण, दीप प्रज्वलन तदनंतर उपाध्याय संघाला शास्त्र दान आणि नंतर संगीतमय अष्ट द्रव्य सहित पूर्ण भक्ती भावाने विद्यासागर महाराजांचे पूजन झाले यात विशेषता महिला मंडळाने आणि खानदेश स्वाध्याय ग्रुपने आपली उपस्थिती नोंदविली यावेळी उपाध्याय वीरंजन सागर जी महाराज यानी प्रवचनात सागीतलेकी संत शिरोमणी यांच्या जीवनात वाणीतील अस्सलपणा, साहित्यातील सर्जनशीलता आणि स्वभावातील साधेपणा यांचा त्रिवेणी संगम होता. ते अजिंक्यतेचे शिखर होते, त्यांची वितरागीपणा प्रमाण होती. ज्याचे जीवन मलयगिरी चंदनाइतके सुगंधित होते. ते सर्व जगाचे दिपस्तंभ होते. आचार्य भगवानांची चेतना पुष्पराग प्रमाणे निष्पक्ष होती. त्यांना ना जातीपातीचे प्रयोजन होते, ना त्यांच्याकडे आमची - त्यांची असा भेदभाव होता. ना कोणाबद्दल राग होता. आचार्य श्रींचे जीवन सर्वांसाठी कल्याणकारी होते. आचार्य भगवानांचे जीवन वटवृक्षासारखे होते. त्यांच्या उपदेशात आणि चर्चेत महावीर दिसत होते. असे सागितलं यावेळी देशमुख नगर छत्रपती संभाजी नगर मधील समस्त जैन बांधवांनी आपला सहभाग नोंदवला अष्टांनिका महापर्व निमित्त श्री सिद्धचक्र महामंडल विधान उपाध्याय विरंजन सागर जी महाराज याचा परम पावन सानिध्यात अष्टांनिका महापर्व निमित्त सिद्ध भगवताची भक्ति करण्यासाठी श्री सिद्ध चक्र महामंडल विधान आयोजन केले आहे.

## "वेळ नाही..... ?

बारा तासाचा प्रवास चार
तासांवर आला, तरी माणूस म्हणतो –

**वेळ नाही**
बारा माणसांचं कुटुंब दोन माणसांवर आलं, तरी माणूस म्हणतो –
**वेळ नाही**
चार आठवड्यांनी मिळणारा निरोप आता चार सेकंदांत मिळतो, तरी माणूस म्हणतो–
**वेळ नाही**
कधी काळी दूरच्या माणसाचा चेहरा पाहायला वर्ष लागायची,
आज तो सेकंदात दिसतो –तरी माणूस म्हणतो –
**वेळ नाही**
घरात वरखाली जायला लागणारा वेळ आणि श्रम, आता लिफ्टने सेकंदात संपतोय, तरी माणूस म्हणतो –
**वेळ नाही**
बँकेच्या रांगेत तासनतास थांबणारा माणूस, आता मोबाईलवर काही सेकंदांत व्यवहार करतो, तरी माणूस म्हणतो –
**वेळ नाही**
एकेकाळी काही आठवड्यांचा कालावधी लागणाऱ्या आरोग्य तपासण्या, आता काही तासांत होतात, तरी माणूस म्हणतो –
**वेळ नाही**
ॲक्टिवा चालवताना एका हातात हँडल, दुसऱ्या हातात मोबाईल, कारण थांबून बोलायला
**वेळ नाही**
ट्रॅफिक जाम झाला की दोन लेन ओलांडून तिसरी तयार करतो, कारण
**वेळ नाही**
पुस्तक वाचायला
**वेळ नाही**
आई-वडिलांना फोन करायला
**वेळ नाही**
निसर्गात रमायला
**वेळ नाही**

**पण ....**
आयपीएलसाठी वेळ आहे
नेटफिलक्ससाठी वेळ आहे
सटरफटर रील्ससाठी
**वेळ आहे**
राजकारणावर चर्चा करायला
**वेळ आहे**
पण स्वत:साठी वेळ नाही
जग सोपं झालं, गती वाढली,
तंत्रज्ञान जवळ आलं, अंतरं संपली, सोयी वाढल्या, संधी वाढल्या
पण माणूस वेळ नाही म्हणत स्वत:पासून दूर गेला.
शांत बसून स्वत:शी बोलायला,
स्वत:ला समजून घ्यायला,
किंवा फक्त काही क्षण निखळ हसायला
**वेळ नाही**
आणि मग एक दिवस वेळच निघून जातो.
शेवटच्या क्षणी कळतं –
**वेळ होता**
पण आपणच वेळ नाही असं म्हणत जगायला विसरलो होतो.
**म्हणून आजच ठरवा –**
स्वत:साठी थोडा वेळ राखून ठेवा, नात्यांसाठी थोडा वेळ देऊन बघा.!


ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड
वास्तव
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com


## महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने
१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने
१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

## विशेष



केज येथे आषाढी एकादशी निमित्त जीवन शिक्षण प्राथमिक शाळेतील दिंडी सोहळ्यासाठी चि .विश्वेश ठोंबरे विठ्ठल व चि .श्रीनिवास ठोंबरे संत तुकाराम यांच्या वेशभूषेत तयार झाले होते . दोन्ही ठोंबरे बंधु सुंदर दिसत होते .

# शासकीय धान्य गोदाम हमाल सहा महिन्यापासून मानधन विना

**➤ उपासमारीची वेळ ➤ संघटनेची जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे याचना**

माजलगाव / प्रतिनिधी : बीड जिल्ह्यातील गावागावात सरकारचे धान्य साठविण्यासाठी मोठे मोठे गोदाम निर्माण केलेले आहेत सदर गोदामातून खेड्यापाड्यातील गावोगावच्या राशन दुकानावर माल पोहोचवण्यासाठी हमाल, मापाडी यात महत्त्वाची भूमिका बजावतात, गोरगरिबाच्या तोंडात सुखाचे दोन घास जावेत म्हणून तळमळ करतात गोदामातून गाडी भरायची आणि पुन्हा ती गाव गावच्या खेड्यात खाली करायची एवढं परिश्रम घेणारी हमाल मापाडी लोक मात्र सध्या उपाशी असल्याचे दिसत आहेत गेल्या सहा महिन्यापासून जिल्ह्यातील हमाल मापाडी यांना मानधनच दिले गेले नसल्याने गोर गरीबाच्या तोंडात चार घास घालणारे हमाल मापाडी उपाशी राहणे हे बीड जिल्ह्यातील जनतेला कसे योग्य वाटेल हमाल मापाडी संघटनेच्या वतीने अनेक वेळा निवेदन देऊन मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त संभाजीनगर, जिल्हा पुरवठाधिकारी बीड यांच्या समक्ष बैठकाही झाल्या मात्र हमाल बांधवांच्या वाट्याला फक्त आणि फक्त आश्वासनच मिळाले आहेत हमाल मापाडी करणारे लोक हे काही करोडपती नाहीत गरीबाच्या तोंडात चार घास पोहोचवणारे गरीबच आहेत मात्र सरकारकडून दुर्लक्षित झालेले गरीब यांचा तरी संसार चालणार कसा नव्यानेच रुजू झालेले बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या गोर गरिबांच्या आर्थिक विवेचनेकडे लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावतील अशी अपेक्षा जिल्ह्यातील हमाल मापाडी व्यक्त करत आहेत या उपरही सरकारला आणि जिल्हा प्रशासनाला जाग न आल्यामुळे राजकुमार घायाळ यांच्यामार्गदर्शना खाली मुकादम वैजनाथ शिंदे, दशरथ शिंदे ,विजय साळवे ' पांडुरंग शिंदे ,लक्ष्मण होके–, गोविंद होके ,देविदास होके राजेभाऊ वाघमारे ,ज्योतीराम खामकर, वैभव पारवे सह तालुक्यातील सर्व हमाल दिनांक ३ जुलै पासुन काम बंद आंदोलन करत असल्याने अनेक गावात धान्य पोहचवण्यास बाधा पोहचत आहे याची जिह्वा प्रशासणाने दाखल घेऊन हमाल मापडी वर्गाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी ही जनतेतून होत आहे .






## मागिल पाचपर्षापासुन सामाजिक उपक्रमांनी मा.बच्चुभाऊ कडू यांचा वाढदिवस केला जातो साजरा

माजलगाव : शेतकऱ्यांचे कर्ज माफी साठी महाराष्ट्रातच नव्हे तर देशात आदोलन करणारे समाजाला आपले काही देणे लागते म्हणून माजलगाव प्रहारचे पदाधिकारी समाजकार्यात झोकून देणारे सतत समाज कार्यात अग्रेसर असून ताचे नेते दिव्यांग बांधवांचे हृदय सम्राट प्रहार चे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांचा ५ जुलै वाढदिवसानिमित्त मागिल पाच वर्षापासून शाळेतील विद्यार्थी यांना छोटीशी मदत म्हणून माजलगाव तालुक्यातील १३ जिल्हा परिषद व शहरातील संस्थेतील ३ शाळेतील ५ हजार विद्यार्थी यांना शालेय साहित्य वही व मौजे आडगाव येथील दिव्यांग बांधवांला तीन चाकी सायकल रिक्षा व रक्तदान करून वाढदिवस केला साजरी या कार्यक्रमासाठी माजलगाव प्रहार चे गोपाळ पैंजणे, भरत डोंगरे, नितीन कांबळे, हरिश्चंद्र जाधव, विजय जोगडे,अशोक अर्जुन, लक्ष्मण गरड, युवराज राठोड, विकास जगताप, मयूर शर्मा, विलास लवाळे, गणेश शिंदे, रत्नाकर गोरे, महादेव डाके, अनिल देशमुख या पाच दिवसासाच्या कार्यक्रमा साठी प्रहार चे अनेक पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते .




## जिजाऊ विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थी-वारकरी दिंडीचे आयोजन

अंबाजोगाई : प्रतिनिधी

शहरातील जिजाऊ विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विविध संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी विद्यार्थ्यांनी विविध संत, वारकरी, विठ्ठल–रुक्मिणी यांच्या वेशभूषा परिधान करून वारकरी दिंडीचे आयोजन केले . परिसरातील जागृती हनुमान मंदिर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले . परिसरातील नागरिकांनी या विद्यार्थी वारकरी दिंडीचे जागोजागी स्वागत केले . शालेय अभ्यासाबरोबरच आपला सांस्कृतिक वारसा जोपासण्याचे काम शाळेच्या माध्यमातून नेहमीच केले जाते च्या बद्दल जिजाऊ शाळेच्या कार्याचे नागरिकांनी कौतुक केले .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका मोहिनी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मनीषा शिंदे, रंजना माळी, अनुराधा काळे, ईश्वरी शिंदे, अंजली सिरसाठ, सुषमा मगर, प्रिती बिडवे,अनुराधा पांचाळ यांनी परिश्रम घेतले .

## संत रविदास महाराज मंदिर परिसरातील शौचालय कामाचे भुमिपुजन



माजलगाव / प्रतिनिधी : शहरातील संत रविदास महाराज यांच्या मंदिर परिसरात आमदार प्रकाश सोळंके यांच्या आमदार फंडातुन बांधण्यात येत असलेल्या शौचालय कामाचे भूमीपुजन बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, सचिव हरिभाउ सवणे यांच्या हस्ते दि .१ जुलै २०२५ रोजी करण्यात आले .

शहरातील संत रविदास महाराज यांच्या मंदिर परिसरात आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या आमदार फंडातून बांधण्यात येत असलेल्या समाजाच्या अत्यन्त जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या शौचालय कामाचा भूमीपूजन समारंभ बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, नवनाथ धाईजे, बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, काशिनाथ साळवे, भा . ज . पा . अनुसूचित जाती मोर्चा बीड जिल्हा उपाध्यक्ष सत्यनारायण उनवणे, दिलीप सोनवणे, राधाकिसन भाळशंकर, अशोक गवळी, अशोक भालशंकर, सहदेव खंडागळे, संतोष जाधव, युवराज नरवडे, राजेश साबळे, मयूर वाघमारे, प्रसाद वाघमोडे, अरविंद खंडागळे, पंडित चव्हाण, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हा अध्यक्ष राजेश जाधव, चर्मकार उठाव संघाचे जिल्हा अध्यक्ष सचिन कांबळे यांची उपस्थिती होती .

## पालक , शिक्षक व विद्यार्थी यांच्या समन्वयातूनच देश महासत्ता होईल - मेजर प्रा एस. पी.कुलकर्णी

माजलगाव / प्रतिनिधी : विद्यार्थी, पालक व शिक्षक या त्रिवेणी संगमातूनच संवाद व्यवस्थित असेल तर आपला देश लवकरच महासत्ता होईल असे प्रतिपादन सेवानिवृत्त मेजर प्रा . एस . पी . कुलकर्णी यांनी केले . ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या पालक मेळाव्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते .

या प्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, भा शि . प्र संस्थेचे केंद्रीय सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे, प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा . अंकुश साबळे, पालक प्रतिनिधी श्री ढगे, श्रीमती घुगे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती .

यावेळी बोलतांना मेजर प्रा . एस . पी कुलकर्णी यांनी पालकांना शिक्षणासोबत समाजात जगतांना जागरूक होण्याची गरज सांगितली . कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा . अंकुश साबळे यांनी केले . या प्रसंगी वैयक्तिक पद्य कुणाल कुलकर्णी यांनी सादर केले . संस्थेचे केंद्रीय सदस्य व संकुलाचे पालक प्रकाश दुगड यांनी पालकांना आपला पाल्य किती वेळ मोबाईल पाहतो याकडे लक्ष द्यायला सांगितले . त्याचा हा वापर मर्यादित करावा असेही म्हटले .

केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी केवळ शिक्षक नव्हे तर पालकांनी स्वत :च्या पाल्याच्या प्रगतीसाठी पुढाकार घ्यावा लागेल असे म्हटले . अध्यक्षीय समारोप करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की, पालकांनी आपल्या पाल्याकडे आता लक्ष देताना त्याची संगत कोणती आहे हे चौकसपणे पाहावे . तसेच आहाराकडे लक्ष दयावे . दुसऱ्या सत्रात शिक्षक पालक संवादामध्ये प्रत्येक शिक्षकाने स्वत :चा परिचय करून दिला . प्रा . डॉ . राजाराम जाधव व प्रा . कल्याण मिटकरी यांनी मनोगत व्यक्तकरून विविध शाखा व त्यामधील संधी कोणत्या आहेत हे सांगितले .

पालकांच्या वतीने बळीराम माने व श्रीमती शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले . मान्यवरांचे आभार पर्यवेक्षक प्रा . परमेश्वर खेत्री यांनी मानले . सूत्रसंचालन प्रा .लक्ष्मीकांत सोन्नर व प्रा .राघवेंद्र मुळी यांनी केले .




## स्वच्छता दिंडी उत्साहात




अंबाजोगाई : प्रतिनिधी

तालुक्यातील देवळा येथील विश्वरुपी माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येच्या निमित्ताने गावातून स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आले . याबाबत सविस्तर असे कि, अध्यात्माला स्वच्छतेची व आरोग्याची जोड देऊन समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी देवळा येथील सदरील विद्यालयाच्या वतीने स्वच्छता दिंडी आयोजित करण्यात आली होती . या दिंडीत विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेशात टाळ – मृदंगाच्या गजरात गवळणी व अभंगाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश दिला . गावातील सार्वजनिक ठिकाणाची विद्यार्थी व शिक्षकांनी स्वच्छता केली . ही दिंडी यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक खोसे एस . जे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावकरी यांनी परिश्रम घेतले .

## आगामी सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पैठण शहरातुन पोलिसांचे पथ संचलन

पैठण : सर्जेराव खडसन

पैठण पोलीस ठाण्याच्या वतीने आगामी सण–उत्सव तसेच आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर शहर व आजूबाजूच्या परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून पोलिस ठाणे हद्दीत शांतता नांदवणे तसेच नागरिकांमध्ये पोलिसांप्रती विश्वास निर्माण करून गैरकृत्य करणाऱ्या समाजकंटकांच्या मनात पोलिसांची भीती निर्माण करून आगामी सन उत्सव आनंदात साजरे होण्याच्या अनुषंगाने शहरातुन पथसंचलन करण्यात आले या पथ संचलनामधे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ . सिद्धेश्वर भोरे, पोलिस निरीक्षक महादेव गोमारे, ४ पोलिस अधिकारी,८० पोलिस अंमलदार आणि होमगार्ड यांनी सहभाग घेतला .

पैठण शहरातील सर्व व्यापारी बांधवांना आवाहन करण्यात आले आहे की, आषाढी एकादशी निमित्त पैठण येथील शांती ब्रह्म संत एकनाथ महाराज यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेण्यासाठी ग्रामीण व शहरातील भाविक भक्तांची अलोट गर्दी होत असल्याने
वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही . त्यामुळे शहरात येणाऱ्या सर्व जड वाहने अन्य मार्गाने वळवण्यात आले आहे .त्यामुळे शहरातील व्यापाऱ्यांनी आपले माल वाहतूक करणारे कोणतेही वाहन दि .६/७/ २५ रोजी शहरात बोलावू नये .असे आवाहन पैठण पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस निरीक्षक महादेव गोमारे यांनी केले आहे .





## आशा गटप्रवर्तकांचा थकीत मोबदला त्वरित द्या - शिवाजी कुरे

माजलगाव / प्रतिनिधी : आशा गटप्रवर्तकांच्या थकीत मोबदल्यासाठी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ घुबडे सर यांना आपल्या मागण्या चे निवेदन देण्यात आले .

गेल्या सहा महिन्यांपासून आशा गटप्रवर्तकांचा केंद्र सरकारने केलेल्या कामाचा मोबदला दिलेला नाही व राज्य सरकारने दोन महिन्याचा मोबदला दिलेला नाही त्यामुळे आर्थिक ताण पडत असून उपासमारीची वेळ आली आहे तरीही शासनाला यांचे कांहीच वाटत नाही उलट त्यांच्या कडून गेल्या सहा महिन्यांपासून विना मोबदला काम करून घेतले जात आहे याचा संघटनेच्या वतीने तीव्र निषेध केला असून कामाचा मोबदला जूलै महिना अखेर पर्यंत न दिल्यास आशा व गटप्रवर्तक आरोग्य योजनेची कोणतीही कामे करणार नाहीत असा इशारा काल दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे .

यावेळी शिष्टमंडळात संघटनेचे जिल्हा अध्यक्ष शिवाजी कुरे, तालुका अध्यक्ष उर्मिला शेंडगे,उषा औसे, सत्यभामा माने, ज्योती घडसे,मिरा सुरवसे ,छाया मस्के इत्यादी उपस्थित होते .





http ://epaper .beedvastav .com
https ://www .beedvastav .com

**मयत खातेदाराच्या वारसाला दिला दोन लाखाचा धनादेश ➤ शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वी**

# एसबीआय बँकेचा 70, वा वर्धापन दिन वडवणीत साजरा

वडवणी : भारतीय स्टेट बँक संपूर्ण भारत देशामध्ये नावाजलेली बँक आहे . या बँकेचे कोट्यावधी ग्राहक असून बँक विश्वासार्हतेच्या बळावर आजही नावलौकिक करत आहे . या बँकेचा सत्तरावा वर्धापन दिन वडवणी येथील एसबीआयच्या शाखेमध्ये साजरा करण्यात आला . बँकेच्या वतीने गेल्या आठवड्यात भव्य दिव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले होते . तर एक जुलै या कर्षिदिनी बँकेचे ग्राहकाच्या हस्ते केक कापून बँकेचा ७० वा वाढदिवस साजरा करण्यात आला . बँकेचे शाकाधिकारी अंकुशराव जाधव आणि इतर सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी उपस्थित सर्व ग्राहक शेतकरी बांधवांना यावेळी शुभेच्छा दिल्या तर बँकेचा एका खातेदार ग्राहकाचा मृत्यू झाला होता त्या ग्राहकाचा विमा उतरला असल्यामुळे दोन लाखाचा धनादेश यावेळी त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आला .

वडवणी येथील भारतीय स्टेट बँकेत शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांच्या नियोजनाखाली बँकेचा कारभार अगदी योग्य पद्धतीने चालत आहे . या बँकेच्या मार्फत शेतकरी व्यापारी तसेच नोकरदारांना योग्य सेवा दिली जाते . त्यामुळे या बँकेचे नावलौकिक मोठ्या प्रमाणात झालेले आहे . या बँकेमध्ये ७० वा वर्धापन दिनानिमित्त गेल्या आठवड्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिरात ७० जणांनी रक्तदान केले सर्व रक्तदात्यांना बँकेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली तर या बँकेचे ग्राहक असलेले लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांच्या वतीने एक झाड आणि पुस्तक देऊन रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला . त्यानंतर एक जुलै हा बँकेचा वर्धापन दिन असल्यामुळे आणि याच दिवशी कृषी दिन असल्यामुळे बँकेमध्ये भव्य दिव्य वर्धापन दिन साजरा करण्यात आला . बँकेचे वयस्कर ग्राहक श्री भंडारे यांच्या हस्ते केक कापून बँकेचा सत्तरावा वाढदिवस साजरा करण्यात आला . यावेळी बँकेचे शेकडो ग्राहक उपस्थित होते . आलेल्या सर्व ग्राहकांना बँकेचे शाकाधिकारी अंकुशराव जाधव तसेच सहाय्यक शाखाधिकारी गजानन बोकारे, रवींद्र बाळासाहेब गांगर्डे, भ्रिगू पाठक, संकेत शहाणे, राज टकले, अरुण शिंदे ज्ञानेश्वर शिंदे , यांनी स्वागत केले . यावेळी बोलताना शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांनी सांगितले की भारतीय स्टेट बँक ही ग्राहकांच्या सेवेमध्ये नेहमी तत्पर असते . सर्वसामान्य शेतकरी तसेच व्यापारी नोकरदार आणि शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व ग्राहकांना बँक योग्य पद्धतीने सेवा देत आहे . पुढील काळातही बँक ग्राहकांच्या हिताचे कामकाज करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला . यावेळी बँकेचे मयत ग्राहक सोनाजी पाराजी उजगरे यांचा मृत्यू झाल्यामुळे तसेच त्यांचा २० रुपयाचा विमा उतरलेला असल्यामुळे त्यांना बँकेच्या माध्यमातून त्यांच्या वारसाला दोन लाखाचा धनादेश विभागीय अधिकारी अमित धुळे व बँकेचे मुख्य प्रबंधक एबेनेझर राज यांच्या हस्ते यावेळी सुपूर्त करण्यात आला .



### श्री. सहाय्यक व्यवस्थापक गजानन बोखारे यांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक”

श्री . गजानन बोखारे, सहाय्यक व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेले अधिकारी, यांनी त्यांच्या कर्तव्यदक्षतेने, सकारात्मक दृष्टिकोनाने आणि उत्कृष्ट नेतृत्वगुणांनी आपली वेगळी छाप निर्माण केली आहे . कार्यालयीन कामकाजातील अचूकता, वेळेचे नियोजन व सहकाऱ्यांशी समन्वय यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीचे सर्व स्तरांवर कौतुक होत आहे . त्यांच्या अथक परिश्रमांना आणि कार्यक्षमतेला दिलेली ही पावती त्यांच्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल आणि इतरांसाठी आदर्श ठरेल .

सांज दैनिक बीड
# वास्तव
भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट



## दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी कानिफनाथ विद्यालय उज्वल भवितव्य ठरलं!

वाडी-वस्ती-तांड्यावरील विद्यार्थी देखील शिकावेत त्यांनी मोठ व्हावं असं स्वप्न पाहणाऱ्या वहिनी साहेबांनी मोहखेड येथे कानिफनाथ विद्यालयाची स्थापना केली. यामुळे परिसरातील हजारो विद्यार्थी आज शिक्षण घेत आहेत.एवढेच नव्हे तर या शाळेमध्ये येणाऱ्या मुलींसाठी ज्यांना येण्या जाण्याची काही साधन नव्हते अशा मुलींना वहिनींनी स्वतः सायकलीचे वाटप केले जेणेकरून त्यांना शाळेत येण्यासाठी कोणावरही अवलंबून राहावयाची गरज नाही.

# अनाथांची माऊली दादांची सावली!

संस्कृतीने आणि संस्काराने समृद्ध असलेल्या आपल्या महाराष्ट्रात आपल्या जन्मदात्रीला माऊली म्हणतात . ज्यांच्यामध्ये ज्याला आई दिसली ती त्याच्यासाठी माऊली झाली . आळंदीचे संत ज्ञानेश्वर माऊली आणि पंढरीच्या विठ्ठलात देखील आपल्याला आई दिसते . म्हणून आपण ज्ञानेश्वर माऊली आणि विठू माऊली म्हणून त्यांना आळवतो . स्वत ःच्या मुलासाठी आपल्या आयुष्यातील सुखाचा त्याग करून आलेल्या संकटांचे डोंगर पार करून आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आयुष्याच्या एकेक क्षण वेचत असते ती आपली आई असते . परंतु आपल्या महाराष्ट्राच्या भूमीत अशा अनेक स्त्रिया होऊन गेल्या ज्यांनी आपल्या उदरातून जन्म न देता देखील त्या हजारोंच्या माता झाल्या . स्त्री शिक्षणाबरोबरच अनेक निराधारांचा सांभाळ करणाऱ्या सावित्रीबाई फुले, आनंदवनांच नंदनवन ज्यांच्या समर्पणा शिवाय फूलणे शक्य नव्हते अशा साधनाताई आमटे, सावित्रीचा वसा घेऊन स्त्रियांच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या फातिमा शेख आणि जिंकण्यासाठी जन्म आपला हे सांगणाऱ्या महाराष्ट्राच्या माई म्हणजे सिंधुताई, आपल्या दानधर्मामुळे आणि कुशल राज्य कारभारामुळे इतिहासात अमर झालेली बीड जिल्ह्याची लेक म्हणजे अहिल्याबाई होळकर ( पूर्वी चौंडी हे बीड जिल्ह्यात होते ) अशा अनेक स्त्रिया महाराष्ट्रात होऊन गेल्या . ज्या खऱ्या अर्थाने माऊली होत्या . या स्त्रियांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजातील सर्व घटकांचा विकास हा ज्यांच्या श्वास आणि ध्यास आहे . मराठवाड्यात ज्यांची ओळख आनाथांची माऊली अशी आहे, अशा माजलगाव तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिवर्तनाच्या जनक म्हणजे सर्व सामान्यांच्या आराध्य आदरणीय मंगलाताई प्रकाश दादा सोळंके . सर्व सामान्यांमध्ये वहिनी म्हणून परिचित असलेल्या मंगलाताईंनी माजलगाव तालुक्यात परिवर्तनाचे विद्यापीठ उभे केले आहे . माजलगाव तालुक्यातील आपल्या सत्कर्माची २५ वर्ष पूर्ण करणाऱ्या मंगलाताईंचा जन्म ६ जुलै १९५६ या दिवशी स्व . शिवाजीराव घुले पाटील व स्व . शकुंतलाबाई घूले या सदन शेतकरी दांपत्याच्या पोटी झाला . स्व . शिवाजीराव घुले हे शेतकरी असले तरीही शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत जागृत होते ६० – ६५ वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या सातही अपत्यांना आयसीएसई बोर्डाच्या शाळेत शिक्षण दिले . इतकेच नाही तर गोरगरिबांची मुलं देखील शिकावीत म्हणून रयत शिक्षण संस्थेला स्वत ःची जमीन देऊन कर्मवीर भाऊराव पाटलांना मांजरीमध्ये कॉलेज सुरू करायला लावले .अशा या संपत्तीने, संस्काराने आणि जाणीवेणे समृद्ध असलेल्या मातापित्यांच्या सुसंस्कारात वाढलेल्या वहिनींचे फर्ग्युसन कॉलेजमधील उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ११ मार्च १९७६ या दिवशी प्रकाश दादांशी वहिनींचा विवाह झाला आणि महाराष्ट्राचे दिग्गज नेते व तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व . सुंदररावजी सोळंके यांच्या सून म्हणून वहिनी सोळंके परिवारात आल्या . पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा हा खूपच मागासलेला होता . जुन्या रूढी परंपरा पाळणारा होता . स्त्रियांना चूल आणि मुल व्यतिरिक्त उंबरठा ओलांडून काही करण्याचे स्वातंत्र्य नव्हते आणि त्यामुळे आपल्या माहेरी भरजरी आयुष्य जगलेल्या वहिनींना देखील आपल्या आयुष्याची काही वर्ष सर्वसामान्य स्त्री सारखेच उंबऱ्याच्या आतच काढावी लागली . परंतु खरं म्हणजे बालपणापासूनच वहिनींमध्ये असलेले नेतृत्वाचे गुण आणि नियतीने त्यांना दिलेली कुशाग्र बुद्धिमत्तेची देनगी, त्याचबरोबर इंग्रजी सारख्या भाषेवर त्यांचे असलेले प्रभुत्व आणि समाजाचे आपण काही देणे लागतो हा विचार वहिनींना कधीच घरात बसू देणारा नव्हता . यासाठी परिवाराची संपूर्ण जबाबदारी स्वत ःकडे घेऊन त्यांनी दादांना जणू माजलगाव तालुक्यातील जनतेच्या सेवेसाठी सर्व प्रापंचिक जबाबदाऱ्यातून मुक्त केले होते . जर वहिनींनी कुटुंबाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली नसती तर दादांसारख्या नेतृत्वाला तालुका मुकला असता एवढं मात्र नक्की .

## ओढ अंतरीची तुझ्या मांगल्याची!

● १९९१ मध्ये दादांनी कारखाना उभा केला आणि दादा बीड जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय झाले .प्रस्थापितांना धूळ चारत दादांनी विजय संपादित केला आणि सभापतीपदी विराजमान झाले .तेव्हा दादांचा देखील ग्रामीण भागातील जनतेच्या समस्यांची त्यांना जाणीव झाली अनेक वेळेला दादांची वहिनींशी या विषयावर चर्चा होत असे . तेव्हा वहिनींना असे वाटायचे की आपणही माजलगावला जाऊन या सर्व सामान्यांसाठी यांचे जीवन सुखकर व्हावे यासाठी काहीतरी करावे परंतु वहिनींवर देखील मुलांची जबाबदारी होती मुलं लहान होती त्यामुळे ही गोष्ट त्यांना शक्य नव्हती परंतु जेव्हा केव्हा त्यांना वेळ असेल तेव्हा त्या दादांकडे हट्ट करायच्या की “मला माजलगावला घेऊन चला”त्यामुळे अनेक वेळेला वहिनींची माजलगावला चक्कर होत असे येथील महिलांशी त्यांचा मुक्त संवाद होत असे तेव्हा वहिनींच्या एक गोष्ट लक्षात आली की या भागात एक दर्जेदार इंग्रजी माध्यमाच्या शाळेची गरज आहे . दादांनी उभा केलेल्या कारखान्यामुळे या भागातील लोकांची आर्थिक स्थिती सुधारत होती पण शैक्षणिक स्थिती मात्र कमालीची दयनीय आहे या भागातील श्रीमंताची मुलं मुंबई पुण्यामध्ये शिक्षणासाठी जातात पण शेतकऱ्यांची मुलं जाऊ शकत नाहीत . त्यासाठी आपण एक निवासी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करू असा आग्रह त्या दादांकडे करू लागल्या दादांना आणि स्व . सुंदररावजी सोळंके साहेबांना देखील वहिनींचा हा विचार पटत होता वहिनींचे हे स्वप्न लवकरच पूर्ण होणार होते .

## सर्व सामान्यांमध्ये वहिनी म्हणून परिचित असलेल्या मंगलाताई म्हणजे माजलगाव तालुक्याच्या परिवर्तनाचे विद्यापीठ

## मंगलताई वहिनींच्या त्यागामुळे, तपश्चर्येमुळे माजलगाव तालुक्यात दादांसारखं एक अष्टपैलू नेतृत्व बहरत गेलं!

## वहिनींनी कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर घेतली नसती तर दादांसारख्या नेतृत्वाला तालुका मुकला असता एवढं मात्र नक्की!



## जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग आणि फिजिओथेरपी कॉलेज

● महिला सबलीकरणाच एक पाऊल म्हणून वहिनींनी काही वर्षांपूर्वीच नर्सिंग कॉलेजची सुरुवात माजलगाव सारख्या ठिकाणी केली . आज या कॉलेजमधून अनेक विद्यार्थिनी शिक्षण घेऊन पुणे – मुंबई येथील नामांकित हॉस्पिटलमध्ये काम करत आहेत .तसेच फिजिओथेरपी कॉलेजची स्थापना देखील मागच्या दोन वर्षांपूर्वीच बहिनी साहेबांनी केली आहे .कायम नाविन्याचा ध्यास असलेल्या वहिणी आपल्या माजलगाव मतदार संघासाठी नवनवीन उपक्रम राबवत असतात .

## निराधारांना आधार वहिनींचा!

असं म्हणतात जगी जाशी कोणी नाही त्यासी देव आहे ,माजलगाव मधील सर्वसामान्यांना ज्यांच्यामध्ये देवत्व दिसले अशा वहिनीसाहेब जेव्हा आपल्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी खेडोपाडी फिरू लागल्या तेव्हा समाजातील काही विदारक गोष्टी त्यांच्या निदर्शनास आल्या. काही अशी मुलं त्यांच्या पाहण्यात आली ज्यांना आई-वडील नाहीत मुलांचा सांभाळ नातेवाईक करतात किंवा आई किंवा वडील नाहीयेत आणि एकल पालक त्यांचा सांभाळ करत आहे तेव्हा मुलांची होणारी हेळसांड , हे सर्व पाहिल्यानंतर वहिनींनी या मुलांना दत्त घ्यायचे ठरवले.त्यांची संपूर्ण जबाबदारी वहिनींनी स्वीकारून त्यांना उत्तम शिक्षण मिळावे म्हणून जातीने लक्ष घातले.सुरुवातीच्या काळात या गोष्टीसाठी लागणारा आर्थिक खर्च वहिनी दादांकडून घेत असत दादांना आमदार म्हणून मिळणारा पगार हा वहिनी निराधारांसाठी खर्च करत असत.वहिनीसाहेब या मुलांच्या आरोग्याची देखील काळजी घेतात नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच शाळेच्या पोशाखासह सर्व शालेय साहित्य यांना पुरवले जाते. दीपावलीला देखील नवीन कपडे आणि फराळाचे वाटप वहिनी करतात एवढेच नव्हे तर प्रत्येक वर्षी या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल देखील घेऊन जातात या मुलांना देखील जन्मदात्या आईप्रमाणे वहिनींचा लळा लागला आहे.

## ....भविष्य सावरताना

● ‘ ऐसी कळवळ्याची जाती करी लाभाविना प्रीती ’ असं आपल्या संतांनी म्हटलेलं आहे प्रेम तेच खरं असतं जे निस्वार्थपणे केलं जात . असं निस्वार्थ प्रेम करण्यासाठी फार मोठं मन असावं लागतं जे आमच्या वहिनी साहेबांना लाभलेलं आहे .माजलगाव मतदार संघातील जेवढ्या संस्था आहेत त्या संस्थेमध्ये शिकणाऱ्या प्रत्येक मुलाचं भविष्य उज्वल व्हाव त्याने कुठल्याही चुकीच्या मार्गाने जाऊ नये यासाठी वहिनीसाहेब माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या प्रतिनिधींना प्रत्येक संस्थेवर पाठवतात किशोर मुलांशी संवादित व्हायला सांगतात . त्यांचे प्रश्न ऐकायला सांगतात, त्यांच्या शंकाच निरासरण झालं पाहिजे असं वहिनींना वाटत .

● चूक काय बरोबर काय यातील जाणीव त्यांना करून द्या असं वहिनींचं म्हणणं असतं . आज मोबाईल विद्यार्थ्यांच्या हातामध्ये आल्यानंतर ते अनेक चुकीच्या गोष्टीकडे आकर्षित होतात . पालक आणि पाल्य यातील संवाद आज कमी झालेला आहे प्रत्येक जण आपल्या कामांमध्ये व्यस्त आहेत म्हणून वहिनींना हे उचललेलं पाऊल म्हणजे तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचं जणू पालकत्व स्वीकारलं आणि या उपक्रमा अंतर्गत वहिनी माजलगाव मतदार संघाचे भविष्य सावरताएत हे मात्र नक्की .



● पवित्र ते कुळ पावन तो देश जेथे हरिचे दास जन्म घेती,
हरीचे दास कोणाला म्हणायचे तर जो समाजासाठी,
देशासाठी, रंजल्या गांजण्यासाठी स्वत : चंदनासारखा
झिजतो तो हरीचा दास असतो .
माजलगावच्या मातीचं आणि माणसांच्या पदरी काहीतरी
पूर्व – सुकृत असावं म्हणूनच आपल्या जन्मानं आणि कर्म
कर्माण दोन्ही कुळांना पवित्र करणारी ही घुले पाटलांची
सुसंस्कारी लेक या तालुक्याची सून म्हणून आली आणि
आनाथांची माऊली तर झालीच – झाली पण जिच्या त्यागामुळे,
तपश्चर्यामुळे या तालुक्यात दादा सारख एक अष्टपैलू नेतृत्व बहरत गेलं .
त्या दादांची सावली देखिल हि माऊली झाली .
आशा या अनाथांच्या माऊलीला अभिष्टचिंतनाच्या हार्दिक – हार्दिक शुभेच्छा !!!

**संत तुकाराम महाराज म्हणाले आहेत**

## महिलांना प्रतिष्ठा मिळवून देणारे माजलगाव विकास प्रतिष्ठान


● पुण्यासारख्या बुद्धिवत्तांच्या शहरांमध्ये ज्यांची जडणघडण झाली अशा वहिनीसाहेब जेव्हा माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये जाऊ लागल्या तेव्हा त्यांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे या भागातील स्त्रिया पूर्णपणे पुरुषावर अवलंबून आहेत . परिवाराचा कणा असलेली स्त्री आर्थिक दास्यात जीवन जगत आहे .आर्थिक सक्षमता नसल्यामुळे परिवारात देखील तिचे स्थान दुय्यम आहे तसेच स्त्रियांच्या प्रगतीला बाधक ठरतील अशा अनेक रूढी परंपरा अजून इथे पाळल्या जातात अत्यंत खडतर आयुष्य इथली स्त्री जगते आहे . हे वहिनींच्या लक्षात आले म्हणून त्यांनी २००३ साली माजलगाव विकास प्रतिष्ठानची स्थापना केली त्या अंतर्गत महिला बचत गट स्थापन केले .यालाही सुरुवातीला विरोध व्हायचं कारण महिलांना उंबरठा ओलांडण्याची परवानगी नव्हती अशा ठिकाणी वहिनी स्वत : जाऊन बचत गटाचे महत्त्व पुरुषांना देखील समजावून सांगू लागल्या . छोटेवाडी, मोठेवाडी, बोरगाव अशा गावात सुरुवातीचे गट होते .महिलांना आर्थिक सहाय्य व्हावे म्हणून महिला जागृती पतसंस्थेची स्थापना केली .( आजची लोकनेते नागरी सहकारी पतसंस्था )नंतर मात्र संपूर्ण माजलगाव मतदार संघात गट स्थापन झाली या गटामुळे महिलांनी छोटे – छोटे उद्योग सुरू केले त्यामुळे त्यांच्या हातात चार पैसे देऊ लागले . परिवारातील त्यांचे स्थान सन्मानाचे झाले एवढेच नव्हे तर आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी देखील एक पाऊल पुढे येऊन त्या विचार करू लागल्या . प्रतिष्ठानच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणावर महिला सबलीकरणाचे काम झाले आणि महिलांना प्रतिष्ठा मिळवून देणारे प्रतिष्ठान अशी ख्याती संपूर्ण मराठवाड्यात पसरली .

## स्थापना सिंदफणाची सुरुवात शैक्षणिक परिवर्तनाची

● असं म्हणतात विचाराला कृतीची जोड दिली तर सारं काहीही अशक्य नाही . आदरणीय दादा आणि वहिनींच्या सदविचारातून माजलगाव मध्ये सिंदफणा पब्लिक स्कूलच्या उभारणीचे काम सुरु झाले होते हा काळ १९९९ –२००० असा होता . मुलं मोठी झाल्यामुळे वहिनी स्वत : शाळेच्या उभारणीत लक्ष घालत होत्या . आज आपल्याला सिंदफणा पब्लिक स्कूलचा दिसत असलेला सुंदर परिसर, भव्य इमारती आणि त्याहीपेक्षा मराठवाड्यातील उत्कृष्ट इंग्रजी माध्यमाची शाळा असा सिंदफणाचा असलेला लौकिक याच्या पाठीमागे वहिनींची २५ वर्षाची तपश्चर्या आहे शाळेच्या सुरुवातीचा काळ तर अत्यंत कठीण होता काही वेळेस वहिनींनी स्वत : स्वयंपाक करून विद्यार्थ्यांना जेऊ घातले .वहिनींचे हे काम पाहिल्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटलांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटलांची आठवण येते कारण संस्था भाऊराव पाटलांनी उभ्या केल्या परंतु ते सतत फिरतीवर असायचे आणि संस्थेची पूर्ण काळजी घेण्याचे काम लक्ष्मीबाई करायच्या सिंदफनाच्या बाबतीत देखील तसंच होतं दादांनी शाळा उभी करून दिली पण त्याचं संगोपन मात्र वहिनींनी केले .ग्रामीण भाग असल्यामुळे त्यावेळेस बाहेरचे शिक्षक येत नसत आले तर जास्त दिवस राहत नसत परंतु वहिनी डगमगल्या नाही त्यांनी आपले काम सुरूच ठेवले आज सिंदफणाचं वैभव पाहिल्यानंतर एक गोष्ट आपल्या लक्षात येते ती म्हणजे मोठ्या निष्ठेने व सचोटीने कार्य करत राहताना परिपूर्णतेचा ध्यास कसा घेता येतो आणि उपलब्ध अवकाशात किती परिणामकारक काम करता येते हे वहिनींनी आपल्या कार्यकर्तुत्वाने सिद्ध केलं आहे .

## विजयाच्या शिल्पकार

● आदरणीय वहिनी या दादांच्या पाठीशी सुरुवातीपासूनच खंबीरपणे उभ्या आहेत . आयुष्यात आलेल्या सुख दु ःखाच्या प्रसंगी देखील त्या समर्थपणे दादांची साथ देतात .प्रसंग कितीही बाका असला तरी आपल्या कुशल नेतृत्वगुणाने त्याला कसं सामोरे जायचं याचा परिपूर्ण अभ्यास वहिनींना आहे .याचाच प्रत्यय 2024 मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आला .संपूर्ण महाराष्ट्राच लक्ष लागलेल्या माजलगाव विधानसभा मतदार संघामध्ये दादा विधानसभेसाठी उभे होते विरोधकांनी टीकेचे रान उठवले होते परंतु जनता दादांच्या पाठीशी होती आणि वहिनींनी मुत्सददी पनाने आखलेल्या रणनीतीमुळे दादा विरोधकांना धूळ चारत पाचव्यांदा माजलगाव मतदार संघाच्या आमदार पदी विराजमान झाले . यामधे दादांची ३५ वर्षाची तपश्चर्या तर आहेच पण त्याचबरोबर वहिनीचे समाजकार्य आणि या निवडणुकीमध्ये वहिनींनी स्वत :ला झोकून देऊन माजलगाव मतदार संघ जो आपल्या झंझावती दौऱ्याने पिंजून काढला त्यामुळे निश्चितच या विजयाच्या शिल्पकार वहिनी साहेब आहेत असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही .



डॉ. वरुणराज तौर
सिंदफणा पब्लिक स्कूल,
माजलगाव